गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● विशेषांक ● मंगळवार ३१ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | special issue | Date : 31/10/2023 | blow :Tuesday | Page 4 | Price 4


## जनसेवेतील संस्काराचा वारसा जपणारे जननायक
# मिलनदादा कल्याणशेट्टी





कै. पंचप्पा कल्याणशेटटी (सर) यांच्या जनसेवेतील संस्काराचा वारसा सांगणारे मिलन कल्याणशेट्टी यांनी अल्पावधीतच आपल्या कामाची छाप पाडली आहे. अत्यंत कमी वयात नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर आपल्या नवनवीन जनसेवेच्या योजना राबवून ते इतरांसाठी आदर्श ठरत आहेत. विवेकानंद प्रतिष्ठानच्या प्रत्येक समाजकार्याच नियोजन प्रमुख म्हणून त्यांनी अतिशय चोख व काटेकोरपणे सर्व सामाजिक कार्यक्रम हाताळले आहेत. योग गुरु रामदेव बाबा यांच्या अक्कलकोट येथील शिबीरादरम्यान भाऊ आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य चोख व पद्धतशीर नियोजन करून शिबीर यशस्वी करण्यात महत्वाचा वाटा उचलला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सभेचे यशस्वीपणे नियोजन केले व संपूर्ण नियोजन यशस्वी झाल्याचे पाहुन स्वतः अमितभाई शहा यांनी मिलन कल्याणशेट्टी यांना शुभेच्छा दिल्या. ज्ञानयोगी सिध्देश्वर महाराज, विजयपूर यांची अखंडपणे एक महिना प्रवचन व अन्नदान सेवा नियोजन यशस्वीपणे पार पाडले. कुठलेही कार्यक्रम असो की उपक्रम नेहमी पाठीमागे राहुन बारीक सारीक गोष्टीचे नियोजन करत सामान्य कार्यकर्त्यांप्रमाणे कुठलाही अहंभाव न ठेवता झटत असल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना तरुणांना हुरूप येतो. अत्यंत शांत, संयमी नेहमीच इतरांच्या सुख दुःखात सामील होण्याच्या गुणधर्मामुळे एकदा एखादा माणूस त्यांच्याशी जोडला गेला की, तो कायमचाच जोडला जातो. त्यांच्या या स्वभाव गुणांमुळेच इतरही पक्षांतले त्यांचे पनिष्ठ मित्र आहेत, जे पक्षभेद विसरून समाजकार्यासाठी त्यांच्या सोबत येतात. त्यांच्या या विविधांगी व्यक्तिमत्वामुळे ते आगामी न. पा. निवडणुकीत निवडून येऊन अक्कलकोट नगराध्यक्ष पदावर विराजमान होईलच असे युवकांचे आशास्थान बनले आहेत. मिलन कल्याणशेट्टी हे उच्चशिक्षित नगरसेवक असून व स्वतः पदवीधर असून सोलापूर विद्यापीठाचे सिनेट म्हणूनही ते कार्यरत आहेत. परचा शैक्षणिक व राजकीय दोन्ही वारसा त्यांनी उचलला आहे. तशी त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहता के पंचप्पा कल्याणशेट्टीसर यांच्या राजकारणाचा वारसा असणाऱ्या मिलन कल्याणशेट्टी यांचे वडील मल्लिनाथ हे शिक्षक होते तर आई मंगलाताई या जि.प सदस्या आहेत. भाऊ आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली समाजकार्य सुरू आहे. भाऊ मनोज कल्याणशेट्टी यांनी अभियांत्रिकी शिक्षण येऊन पतसंस्था, मल्टिस्टेट बँक सांभाळत आहेत तर भाऊ सागर कल्याणशेट्टी हनुरचे उपसरपंच आहेत. मिलन कल्याणशेट्टी नगरसेवक म्हणून वार्डात विकासाचा धडाका लावला असून, अक्कलकोट शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नगरपरिषदेतर्फे मंजूर झालेल्या शौचालय बांधकामासाठी नागरिकांना अनुदान कमी पडत असल्याने स्वतः च्या खर्चाने प्रभाग दहा मधील ८८ नागरिकांना स्वखर्चाने शोपखडडा मारून शौचालय बांधण्यात मदत केली. प्रभागात एल ई डी लाईटची सोय केली. स्वच्छ भारत अभियान चळवळीलाबळ देण्यासाठी सुमारे ५०० डस्टबीनचे मोफत वाटप केले. तसेच ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी पुढाकार घेऊन नगरपरिषदेला २०० मोठे डस्टबीन मोफत दिले. तसेच आता नगर पालिका वॉर्डात प्रत्येक घराला दोन डस्टबीन ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी मोफत दिले. याच बरोबर कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले असून पर्यावरण संवर्धनासाठी नगरपरिषदेच्या कॅरीबॅग बंदीला बळकटी देण्यासाठी विवेकानंद परिवारच्या मदतीने १००० कापडी पिशव्यांचे मोफत वाटप मिलन कल्याणशेट्टी यांनी केले. वृक्षारोपण चळवळ व्यापक करण्यासाठी ६०० रोपांचे वाटप केले. प्रभागात पाणीवाटपासाठी नळ योजना दुरूस्त करून घेतली. त्यांनी लोकमान्य गणेशोत्सवाचे मंडळामार्फत विविध उपक्रम राबविले असून तरुणांच्या सार्वजनिक गणपती उत्सवात एक चांगला आदर्श घालून देताना वेगवेगळे उपक्रम राबविले. हे सर्व करत असताना एक रूपयांचीही वर्गणी गणपती उत्सवासाठी कोणाकडूनही गोळा न करता विविध विधायक उपक्रम राबविले व सांस्कृतिक परंपरा जपली. ५०० पेक्षा जास्त युवकांचा लेझीमचा मोठा ताफा गणेश विसर्जन मिरवणुकीत सामील होत असून त्यांच्या युनिफार्मचा सर्व खर्च स्वतः करत आहेत. यंदाच्या गणेश विसर्जना नंतर स्वतः नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांनी स्वखर्चान जवळपास दोनशे कार्यकर्त्यांना देवदर्शन घडवून आणले. के. पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी सुरू केलेला दानताचा वारसा भाऊ आमदार सचिन कल्याणशेट्टी च्या मदतीने नगरपालिका कर्मचा-यांची दिवाळी गोड करण्यासाठी नगरपालिकेतील सर्व कर्मचा- यांना प्रत्येकी ५ किलो साखर मोफत देऊ करून सामाजिक बांधिलकी जपत आहेत. ते नेहमी मदतीस सदैव तत्पर असून कुठलेही विधायक उपक्रम असेल तर त्याठिकाणी आर्वजुन उपस्थित राहुन न सांगता मदत करणारे मिलन कल्याणशेटटी युवकांचे आदर्श बनले आहेत.







**✻ सुविचार ✻**

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

# जनसेवेतील संस्काराचा वारसा जपणारे जननायक मिलनदादा


आमदार राम सातपुते यांच्यासोबत युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा


स्वामी समर्थ अन्नछत्रमंडळाचे अमोलराजे भोसले यांच्यासोबत युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा



भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्यासोबत नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी


सोलापूर विद्यापिठच्या सिनेट सदस्यपदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी यांचा सत्कार


माथाडी कामगारांचे नेते नरेंद्र पाटील, आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्यासोबत युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा


फुटाणे गल्ली नवरात्र उत्सव तरुण मंडळ २०२३ फुटाणे गल्ली अक्कलकोट नवरात्र उत्सव लाईटिंग शो डेकोरेशन उद्घाटन नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते करण्यात आले..
























## संपादकीय

### सोप्या बाबींची माहिती...

आर्थिक साक्षरता बऱ्याच लोकांकडे नसते आणि त्यामुळे बरेच लोक अर्थसंपन्न होत नाहीत. अर्थसंपन्न होण्यासाठी आर्थिक साक्षरता हा फार महत्त्वाचा भाग आहे, परंतु अशी आर्थिक साक्षरता मिळवण्यासाठी खूप सारी आव्हाने आहेत. त्यासाठी खूप सारी आर्थिक शिस्त, संयम लागतो. तुमच्या उत्पन्नाच्या सवयीपेक्षा तुमच्या खर्च करण्याच्या सवयीच तुम्हाला लवकर अर्थसंपन्न बनवतात. आर्थिकदृष्ट्या यशस्वी होण्यासाठी हा आतापर्यंतचा सर्वात मोठा अडथळा आहे. आवेगपूर्णपणे खर्च करणे हा तुमच्याकडे असलेल्या कोणत्याही आर्थिक योजनांचा नाश करण्याचा एक निश्चित मार्ग आहे. तुम्ही खर्च करण्यापूर्वी पुरेसा विचार केला नाही किंवा योजना आखली नाही, तर तुमची आर्थिक उद्दिष्टे कायमच चुकतील. दुर्दैवाने जगात कोणतेही असे मशीन नाही की जे तुम्हाला तुमची खर्च करण्याची इच्छा नियंत्रित करू शकेल. त्यामुळे स्वतःवर नियंत्रण ठेवावेच लागेल. खर्च करण्याच्या तुमच्या आवेगावर नियंत्रण ठेवण्याचा एक संभाव्य मार्ग म्हणजे कुठलाही खर्च करताना तुमची इच्छा आणि गरज यातील फरक ओळखणे. त्यासाठी एक सोपा प्रश्न स्वतःला विचारणे की या खर्चाशिवाय मी जगू शकतो का? याचे उत्तर जर होय असेल तर ती तुमची इच्छा आहे आणि उत्तर नाही असेल तर ती तुमची गरज आहे. तुम्ही जर बचत करीत असाल तर तुम्ही यशाच्या मार्गावर आहात. महागाईचा भडका, महागाईने आर्थिक नियोजनाचा विचका, सरकार महागाई नियंत्रणात आणण्यात अपयशी यांसारख्या बातम्यांचा आपल्यावर विविध माध्यमांतून मारा होत असतो. महागाई म्हणजे काय हे ढोबळमानाने आपल्याला माहिती असते, पण आपल्या गुंतवणुकीवर आणि पर्यायाने आपल्या आर्थिक भविष्यावर महागाई दूरगामी परिणाम करीत असते. वाढत्या महागाईबद्दल राज्यकर्त्यांवर आगपाखड करताना आपण स्वतः काय उपाययोजना करणे आवश्यक आहे याचा विचारही करायला हवा. अटळ ते स्वीकारा, या युक्तीप्रमाणे महागाई असणारच आहे हे कटू वास्तव स्वीकारून आपले गुंतवणूक निर्णय घ्यायला हवेत. वरील काही अडचणी व त्यावरील उपाय नीट समजून घेतले तर आपणही लवकर अर्थसंपन्न होऊ शकतो. आर्थिक शिक्षण म्हणजे फक्त आर्थिक बातम्या वाचणे नव्हे. तुम्हाला देशाचा जीडीपी, अर्थव्यवस्थेची वाढ यांसारख्या गोष्टींची ताजी माहिती नसली तरी एकवेळ चालेल, पण आपल्या स्वतःचे आर्थिक आरोग्य निश्चित करणाऱ्या सोप्या बाबींची माहिती नक्कीच हवी.


संपादक कमलाकर सोनकांबळे यांच्यासोबत युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी

## शांत व संयमी नेतृत्वच इतिहास घडवितात : शहाजी पवार


नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांचा सत्कार जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सचिन कल्याणशेट्टी, यशवंत धोंगडे, विक्रम शिंदे, स्वामीनाथ पुकाळे, अंबण्णा चौगुले, छोटु पवार, बंटी राठोड, शबाब कोरबु, प्रदिप पाटील, नागराज कुंभार आदी.

**अक्कलकोट : प्रतिनिधी**

शांत व संयमी नेतृत्व इतिहास घडवितात असे प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांनी केले. ते जुना अडत बाजार येथे विद्यमान नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांचा वाढदिवसा निमित्त सत्काराप्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, नगरसेवक अंबण्णा चौगुले, आलम कोरबु, जितेंद्र यारोळे, भाजपा तालुकाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, अवनिश कल्याणशेट्टी, सरपंच प्रदिप पाटील, बाबुराव पुकाळे, विक्रम शिंदे, नागराज कुंभार, शबाब कोरबु, छोटू पवार, बंटी राठोड आदी उपस्थित होते.

यावेळी शहाजी पवार यांच्या हस्ते मिलन कल्याणशेट्टी यांचा शाल, श्रीफळ व हार घालुन चांदीची तलवार भेट देवून सत्कार करण्यात आला.

## वागदरी येथील वार्ड क्र.२ मध्ये सिमेंट रस्त्याचे कामाचे भूमिपूजन

**। वागदरी, प्रतिनिधी**

वागदरी येथे वॉर्ड क्र. २ मध्ये ७ लाख रुपयच्या सिमेंट रोडच्या भूमिपूजन जिल्हा परिषदेचे पक्षनेते आनंद तानवडे, रॉयल नागरासेवक मिलन कल्याणशेट्टी, पंचायत समितीचे सदस्य गुंडप्पा पोमाजी यांच्या हस्ते पार पडले, त्यावेळी भाजप नेते श्रीशैल ठोंबरे, ग्रामपंचायत सदस्य सुनील सावंत, रतन बंगरगी, संतोष पोमाजी, वीरभद्र पुरंत, प्रकाश पोमाजी, शिवनिंगप्पा मड्डे, बसवराज नडगेरी, रुपन्ना ममदापुरे, बगली मामा, व घाळीदास संघाचे अध्यक्ष सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




किरनळी येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन कार्यक्रम

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# युवकांचा ऑयकॉन मिलन कल्याणशेट्टी


आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्यासाहेब सागरदादा कल्याणशेट्टी, मनोजदादा आणि नगरसेवक मिलनदादा




अक्कलकोट तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन करताना युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी




क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी


अक्कलकोट तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन करताना युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी



लोकप्रिय आमदार तथा माजी मत्री सुभाष देशमुख, भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेता नगरसेवक मिलन कल्याणशेटटी आपल्या कामाच्या जोरावर युवकांचा ऑयकॉन ठरत आहे. कै. पंचप्पा कल्याणशेटटी सर यांच्या जनसेवेचा संस्काराचा वारसा सांगणा–या मिलन कल्याणशेटटी यांनी अल्पावधीतच आपल्या कामाची छाप पाडली आहे. अत्यंत कमी वयात नगरसेवक म्हणुन निवडुन आल्यानंतर आपल्या नवनवीन जनसेवेच्या योजना राबवुन ते इतरांसाठी आदर्श ठरत आहेत. अक्कलकोट शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नगरपरिषदेतर्फे मंजुर झालेल्या शौचालय बांधकामासाठी नागरिकांना अनुदान कमी पडत असल्याने स्वतःच्या खर्चाने प्रभाग दहा मधील ८८ नागरिकांना स्वखर्चाने शोषखड्डा मिलन कल्याणशेट्टी मारून शौचालय बांधण्यात मदत केले. प्रभागात एल ई डी लाईटची सोय केली. स्वच्छ भारत अभियान चळवळीला बळ देण्यासाठी सुमारे ५०० डस्टबीनचे मोफत वाटप केले. तसेच ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी पुढाकार घेऊन नगरपरिषदेला २०० मोठे डस्टबीन मोफत दिले. तसेच आता वॉडांत प्रत्येक घराला दोन डस्टबीन ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी मोफत देणार असल्याचे सांगितले. पर्यावरण संवर्धनासाठी नगरपरिषदेच्या कॅरीबॅग बंदीला बळकटी देण्यासाठी विवेकानंद परिवारच्या मदतीने १००० कापडी पिशव्याचे मोफत वाटप केले. वृक्षारोपण चळवळ व्यापक करण्यासाठी ६०० रोपांचे वाटप केले. प्रभागात पाणीवाटपासाठी नळ योजना दुरूस्त करून घेतली. तरूणांच्या सार्वजनिक गणपती उत्सवात एक चांगला आदर्श घालुन देताना वेगवेगळे उपक्रम राबविले. हे सर्व करत असताना एक रूपयाचीही वर्गणी गणपती उत्सवासाठी कोणाकडुनही गोळा न करता विविध विधायक उपक्रम राबविले व सांस्कृतिक परंपरा जपली. ५०० युवकांचा लेझीमचा मोठा ताफा गणेश विसर्जन मिरवणुकीत सामील होत असुन त्यांच्या युनिफार्मचा सर्व खर्च स्वतः करत असतो.तेसच नगरपालिका कर्मचा–यांची दिवाळी गोड करण्यासाठी नगरपालिकेतील ६४ कर्मचा–यांना प्रत्येकी ५ किलो साखर मोफत देऊ करून सामाजिक बांधिलकी जपली. कुठलेही विधायक उपक्रम असेल तर त्याठिकाणी आर्वजुन उपस्थित राहुन नसांगता मदत करणारे मिलन कल्याणशेटटी युवकांचे आदर्श बनले आहेत. नगरसेवक असल्याचा गर्व नाही. सर्व तरुणांमध्ये सर्व सामान्यासारखे मैत्रीचे नाते जपणारे, प्रसंगी स्वतः पडेल ते काम करणारे मिलन प्रभागातील काम करत असताना मात्र प्रसंगी आक्रमक बनतात. आपण जनतेची सेवा केली पाहिजे ही भावना सतत जोपासत असतात. आपल्या वागणुकीतुन आदर्श घालून देणारे नगरसेवक मिलन कल्याणशेटटी यांनी सामुदायिक विवाह चळवळीला बळकटी येण्यासाठी स्वतःचा विवाह सामुदायिक विवाह सोहळयात करून इतरांसमोर आदर्श घालून दिला.


आमदार निलेश राणे यांच्यासाबेत युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी


स्वामी समर्थ अन्नक्षत्र मंडळाचा पुरस्कार स्विकारताना युवा आयकॉन नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी



लोकमान्य गणेशोत्सव मंडळाच्या पूजेनंतर सर्वासामान्यांसोबत नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी


नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी हॉस्पिटलमध्ये रुग्णांची विचारपूस करताना


























